<u>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट क्र.२ खामगांव</u>

<u>गुन्ह्याचा तपशील</u>

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५२८/२०२६** **नि.क्र.**

**CNR No. MHBU** 060007292026

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | २६.०२.२०२६ |
| २. | तक्रार दाखल केल्याची तारीख | २६.०२.२०२६ |
| ३. | तक्रार दाखल करणा-याचे नाव व पत्ता | पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन **हिवरखेड**<br>ता.खामगांव, जि.बुलडाणा |
| ४. | आरोपीचे नाव व पत्ता | दुर्गेश भारत जयस्वाल<br>वय-३७ वर्षे, व्यवसाय- मजुरी<br>रा. शिवाजी नगर मलकापुर,<br>ता. मलकापुर, जि. बुलडाणा |
| ५. | गुन्ह्याचा तपशीलः | |

तुमच्यावर असा आरोप ठेवण्यात येतो की, तुम्ही दि.२६.०२.२०२६ रोजी १७.०० वाजताच्या दरम्यान तुम्ही आरोपीने त्याच्या ताब्यातील आटो रिक्षा आमरोडवर उभी लावुन रहदारीस अडथळा होईल व जिवीत्वास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने लावली व त्याआधारे आपण भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ अन्वये गुन्हा केला व तो या न्यायालयाच्या दखलगिरीत येतो.

प्र.क्र.१ तुम्हाला दोषारोपाच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तरः होय.

प्र.क्र.२ तुम्हाला गुन्ह्याचा तपशील समजला काय?
उत्तरः होय.

प्र.क्र.३ तुम्हाला गुन्हा मान्य आहे काय ?

उत्तरः होय. मला गुन्हा कबुल आहे.

-------------

आरोपीची सही

NISHANT DNYANESHWARRAO GOLE
Digitally signed by NISHANT DNYANESHWARRAO GOLE
Date: 2026.03.14 14:31:56 +0530

दि.१४.०३.२०२६

( एन.डी. गोळे)
विशेष न्यायालय
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
खामगांव

## कारणमिमांसा

आरोपी हा स्वतः हजर झालेला आहे. आरोपीने स्वखुशीने सदरचा गुन्हा कबुल केला आहे. त्यासंबंधीची पुरसिस नि.क्र.२ प्रमाणे अभिलेखावर दाखल केली आहे. आरोपीची अशी विनंती आहे की, तो घरातील एकमेव कर्ता पुरुष आहे व त्याच्यावर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. त्याला गुन्हा कबुल आहे, त्यामुळे कमी दंड करण्यावा यावा. उपरोक्त परिस्थितीत मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

(दि.१४.०३.२०२६ रोजी पारीत)

आरोपी याला भारतीय न्याय संहितेचे कलम २८५ चे उल्लंघन केल्यामुळे दोषी ठरविण्यात येते व त्यानुसार रुपये **३००/-** (अक्षरी रुपये तिनशे मात्र) द्रव्यदंड भरण्याची शिक्षा ठोठावण्यात येते. तसेच द्रव्यदंड न भरल्यास १ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

NISHANT DNYANESHWARRAO GOLE
Digitally signed by NISHANT DNYANESHWARRAO GOLE
Date: 2026.03.14 14:32:02 +0530

दि. १४.०३.२०२६

( एन.डी. गोळे)
विशेष न्यायालय
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
खामगांव.